# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/04/2022 (गुरूवार)

## खून

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा तारसा येथे दिनांक १३/०४/२०२२ चे १२.०० वा. ते १२.३० वा. सुमारास **राजकुमार यादवराव आग्रे (मृतक), वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र ३ तारसा ता. मौदा जि. नागपूर** व त्याची पत्नी फिर्यादी नामे— श्रीमती छाया राजकुमार आग्रे, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र ३ तारसा, ता. मौदा जि. नागपूर हिचे सोबत झगडा भांडण करीत असता मृतक याने फिर्यादी हिला कुऱ्हाडीने मारत असतांना यातील विधी संघर्षग्रस्त बालक वय १५ वर्ष याने कुऱ्हाड हिसकावून मृतकच्या डोक्याचे पाठीमागे वार करून खून केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री प्रमोद पंजाबराव चौधरी मो.क्र ९८२३२१७२०५ हे करीत आहे.

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा पटगोवारी येथे दिनांक ०७/०८/२०२० ते ०४.०४.२०२२ चे ११.०० वा. सुमारास पीडित सौ प्रिया उर्फ धनवंता कवडु सहारे(मृतक) वय ३० वर्ष रा. पटगोवारी ता रामटेक हीने दि. ०४.०४.२२ रोजी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्या संबंधाने पो.स्टेला मर्ग क्र. १५/२०२२ कलम १७४ जा.फौ. चा दि. ०५/०४/२०२२ रोजी दाखल आहे. यातील आरोपी नामे— कवडु रामचंद्र सहारे, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र २ पटगोवारी ता. रामटेक व मृतक हे पती पत्नी असुन वर नमुद घटणा, ता वेळी व ठीकाणी यातील पीडित मृतक हीने आरोपी पतीचे बाहेरील स्त्री सोबत असलेल्या अनैतीक संबंधाला कंटाळुन पीडित हिने आरोपी पतीला मनाई केली असता आरोपी पतीने पीडितेला घरीच दिलेल्या मानसीक व शारीरिक त्रासामुळे व केलेल्या छळामुळे पीडितेने विषारी औषध प्राशन करूण आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ. सोनु हरीशचंद्र केमेकर, वय २७ वर्ष, रा. पखिडडे ले—आऊट महादुला यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिलीप बासोडे मो.क्र. ९८२३०८३९०५ हे करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा कावरापेठ हायवे रोड श्री साई श्रीनिवास बार ॲन्ड रेस्टॉरेन्ट उमरेड येथे दिनांक १२/०४/२२ चे २२.१५ वा. ते दि. १३/०४/२२ चे ११.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— किनकया बालया बोलगम वय ५५ वर्ष रा.गांगापुर उमरेड बार मॅनेजर म्हणुन काम करीत असलेल्या साई श्रीनिवास बार ॲन्ड रेस्टारेन्ट कावरापेठ उमरेड येथे अज्ञात आरोपीने बारचे मागिल शटर वर उचलुन आत प्रवेश केला. यानंता आरोपीने बार मधील १) विदेशी दारू आर एस कंपनीची १८० एमएल च्या ४८ निपा असलेली १ पेटी कि. ८,६४०/— रू. २) आय बी कंम्पनीचे प्रत्येकी २००० एमएल चे ६ बम्पर कि. ८,५८०/—रू. व कॉउन्टर मध्ये ठेवलेले नगदी ४,०००/— रू. असा एकुण २१,२२०/— रू. चा मुद्देमाल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पांडे मो.नं. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील नांदगाव येसंबा येथे दिनांक ०४/०२/२२ ते दिनांक ०६/०४/२२ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– योगेश श्यामकांत मोहरील वय ५० वर्ष, रा. प्रकाश नगर, खापरखेडा हे खापाखेडा औष्णिक विधुत केंद्र अतिरीक्त कार्यकारी अभियंता राख हाताळणी विभाग २ खापरखेडा या विभागामध्ये मागिल ५ वर्षापासुन कार्यरथ आहेत. महानिर्मीती कंपनीद्वारे १४ किमी च्या ६ पाईप लाईन नांदगाव येथे टाकल्या पैकी अज्ञात आरोपीने २०० एम एम व्यासाचे १२ मीटर लांबी प्रमाने ८३ लोखंडी पाईप अंदाजे एकुन लांबी १००० मीटर एकुण किंमत ५६,९७,०००/–रु. लोंखडी पाईप चोरीला गेले. तपासादरम्यान आरोपी क्र. १) मनोज धनई पटेल वय ४० वर्ष, रा. कांद्री कन्हान, २) धनजय विदया चव्हान, वय २८ वर्ष, रा.शिवनगर कांद्री कन्हान, ३) राजेश रामअवध सहानी वय २६ वर्ष, रा. शिवनगर झोपडपटटी कन्हान, ४) अमित प्रताप सिंग चव्हान, वय २५ वर्ष, रा. जे.एन.रोड कांद्री कन्हान, ५) अजय शिवसुजन गौतम वय ३० वर्ष, रामडीबाबा कांद्री कन्हान यांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री फुलझेले मो.नं. ९४०४१२३९५० हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. रामटेक**:– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील टिळकवार्ड रामटेक येथे दिनांक १२/०४/२२ चे २०.०० वा. ते दि. १३/०४/२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– उत्कर्ष सुभाष भिवगडे वय २३ वर्ष रा. टिळक वार्ड रामटेक यांनी आपले राहते घरी मागील दोन महीन्यापुर्वी खरेदी केलेली खुर्ची विक्री करीता ओएलएक्स ऑनलाईन ॲप वरती विक्री करीता प्रसारीत केली होती. सदर खुर्चीची ठरावीक रक्कम ७,५००/–रु. ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने त्याचे मोबाईल ने त्याचे स्वॅप मशीनने पेमेंट करतो असे कळविल्याने फिर्यादीने त्यांचे सांगणे प्रमाणे पाठविलेल्या स्कॅन कोड वरती फिर्यादीचा फोन पे क्रमांकानी पेमेन्ट करीता अज्ञात आरोपीने स्वॅप मशीनचे पासवर्ड टाकले असता फिर्यादीचे खात्यामधुन बारी बारी एकुण १,५२,५८६/– रु. परस्पर काढुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(सी), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मकेश्वर पोस्टे रामटेक मो.न. ९०४९९६५०१४ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १६ कि. मी. अंतरावरील गोंडखैरी शिवार देशोन्नती प्रेसच्या समोर येथे दिनांक १३/०४/२२ चे २०.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे– शिवदेव देवीसिंह धनगर वय ४२ वर्ष रा सुराबडी तकीया अमरावती रोड नागपुर यांचा कारीगर नामे– रोहीत भुरा जाटव(मृतक), वय २० वर्ष, रा. राजस्थान ह.मु. वेलकम हॉटेल जवळ गोंडखैरी हा गायीचे दुध आण्याकरीता दुकानातुन नागपुर ते अमरावती रोडने पायदळ जात असता एमएच– ३१/ सीयु– ४८७८ क्रमांकाच्या पॅशन मोटरसायकलचा चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे कारागीरास मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक आरोपी हा आपली मोटरसायकल ठेवुन पळुन गेला. लोकांचे आवाजाने फिर्यादीने तिथे जावुन पाहीले असता त्याचा कारागीर जागीच मरण पावलेला दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादंवि. सहकलम १८४, १३४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री शरद गायकवाड मो.न. ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत कावरापेठ उमरेड येथे दिनांक १३/०४/२२ चे १०.०० वा. सुमारास **राजेराम दिलीप कोकुडे(मृतक) वय ३८ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड** हा आपले घरी बेड वरून उठुन दवाखान्यात जायचे आहे असे म्हटले तसेच 'माझे छातीत दुखत आहे' असे फिर्यादीला सांगत असतांना त्याचे पाय लंगळला व तो बेड वर बसला आणि दातकुडी बसविली असता फिर्यादीने त्यास ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे उपचाराकरिता नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राकेश दिलीप कोकुडे, वय ३० वर्ष, रा. कावरापेठ उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार रामेश्वर रावते ९४२०४०९४५४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**